| | | |
|---|---|---|
| 8. | पुनर्वसित क्षेत्राला महसुली गांव घोषित करणे | पुनर्वसित क्षेत्राला महसुली गांव घोषित करण्याकरीता जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडुन प्रारुप अधिसुचना प्रसिध्द करण्यात आलेली असुन तहसिलदार, सडक अर्जुनी यांचेकडुन सदर बाबतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्याचे प्रमाणपत्र तीन दिवसांत देण्यासाठी निर्देश देण्यात आलेले आहे. सदर प्रमाणपत्र प्राप्त होताच सदर क्षेत्राला महसुली गांव घोषित करण्याबाबतची अंतीम अधिसुचना तीन दिवसांचे आंत प्रसिध्द करण्यात येणार आहे. |
| 9. | पुनर्वसन होत असलेल्या गावामध्ये ग्रामपंचायत स्थापन करणे | पुनर्वसित क्षेत्राला महसुली गांव घोषित करण्याबाबतची अंतीम अधिसुचना प्रसिध्द झालेनंतर 15 दिवसांचे आंत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गोंदिया यांना मा.आयुक्त, नागपुर विभाग यांचेकडे सदर गावांमध्ये ग्रामपंचायत स्थापन करण्याकरीता प्रस्ताव सादर करण्याकरीता कळविण्यात आलेले आहे. |
| 10. | सौंदड येथील पुनर्वसीत ठिकाणी बस थांबा देणे | उपवनसंरक्षक, गोंदिया यांनी प्रबंधक, परिवहन मंडळ (ST), साकोली यांना बस थांबा देण्याकरीता कळविण्याकरीता कळविण्यात आलेले आहे. |
| 11. | पुनर्वसीत ठिकाणी JFM समितीला संरक्षण व व्यवस्थापन करण्याकरीता प्रती कुटुंब 1.00 एकर जागा देण्याबाबत येणा-या अडचणीबाबत | सदर बाबतीत मौजा सौंदड येथिल लोकांनी ग्रामसभा ठराव घेऊन लोकांना जागा देण्यास नकार दिलेला असल्याने पुनर्वसित क्षेत्राला महसुली गांव त्वरीत घोषित होणार असल्यामुळे सदर गावामध्ये ग्रामपंचायत स्थापन करण्याची कार्यवाही झालेनंतर तेथिल ग्रामसभा सदस्यांकडुन ग्रामसभा ठराव घेवुन सदर प्रकरणाबाबत पुढील कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. |
| 12. | LPG गॅस कनेक्शनचे वाटप व दुभत्या जनांवराचे सबसिडीनुसार वाटप करणे | शासन निर्णयाप्रमाणे एकुण 134 कुटुंबांना 75 टक्के सबसिडी वर गॅस कनेक्शन देण्यात आलेले आहे. सध्या आणखी LPG कनेक्शन व दुभत्या जनावरांकरीता कोणाचीही मागणी प्राप्त झालेली नाही. |
| 13. | बोरवेलवर सोलर पंपची सुवीधा बसविणे. | सदर बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गोंदिया यांना कार्यवाही करण्याकरीता कळविण्यात आलेले आहे. |
| 14. | पुनर्वसीत ग्रामस्थांना दिलेल्या प्लॉट च्या जागेचा पट्टा देणे | केंद्र शासनाचे पत्र क्रमांक F.No.5-3/2007-FC दिनांक 08.09.2009 अन्वये व्याघ्र प्रकल्प/राष्ट्रीय उदयान तसेच अभयारण्य क्षेत्रातील गावांचे पुनर्वसनासाठी, वनसंवर्धन अधिनियम 1980 अतर्गत वळतीकरण झालेल्या वनजमिनीचा वैधानिक दर्जा महसुल ज़मीन म्हणुन बदलण्याकरीता मंजुरी प्रदान करण्यात आलेली असल्याने त्याप्रमाणे पुनर्वसित ग्रामस्थांना दिलेल्या प्लॉट चा पटटा देण्याबाबत 15 दिवसांचे आंत कार्यवाही करण्याकरीता तहसिलदार, सडक अर्जुनी यांना कळविण्यात आलेले आहे. |

उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग, गोंदिया